# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### सिंधुदुर्ग जिल्ह्यात ऑनलाईन लॉटरी पध्दतीने देण्यात आलेल्या रिक्षा परवान्यांबाबत

**(१) २२६९४ (०६-०८-२०१५). श्री.सुनिल शिंदे (वरळी), अॅड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ऑनलाईन लॉटरी पध्दतीने देण्यात आलेल्या रिक्षा परवान्यांपैकी व्यपगत झालेले ५०६ परवाने खुले करण्यास तातडीने मंजूरी देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व रिक्षाचालकांनी केली असल्याची बाब माहे जून, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१२-०७-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) सह राज्यातील सर्व परिवहन कार्यालयामध्ये वाहनांचे दहा हजार "नोंदणीपुस्तक (आरसी बुक) पेंडींग" असल्याबाबत

**(२) २४२६७ (०८-०९-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा, पिंपरी चिंचवड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाबरोबरच राज्यातील सर्व परिवहन कार्यालयामध्ये वाहनांचे नोंदणीपुस्तक (आरसी बुक) हे कागदी स्वरुपात सहा महिन्यांपासून दिले जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आगोदर "आरसी बुक" हे "स्मार्ट कार्ड" च्या रुपात दिले जात होते परंतु पुन्हा "आरसी बुक" कागदावर आल्याने पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयामध्ये "आरसी बुक" नागरिकांना उशीराने मिळत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, नागरीकांच्या वारंवार होणाऱ्या तक्रारीनंतर शहरातील एका नागरिकाने "आरटीओ" कडून **माहितीच्या अधिकाराखाली ही माहिती** मागवली असता, यामध्ये १०,६९७ वाहन "आरसी बुक" कार्यालयामध्ये शिल्लक असल्याचे माहिती समोर आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पेंडीग "आरसी बुक" तात्काळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर कार्यवाही करण्यात आली आहे
(५) नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१८-०७-२०१७) :**(१), (२) व (३) होय.
(४) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड मार्फत सर्व प्रलंबित नोंदणी प्रमाणपत्र प्रकरणांचा निपटारा करून कार्यवाही पूर्ण केलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दुष्काळग्रस्तांसाठी शासनाने जाहिर केलेल्या योजनांपैकी एकही योजना दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेली नसल्याबाबत

**(३) २९३५२ (१६-०१-२०१६). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दुष्काळग्रस्तांसाठी शासनाने जाहिर केलेल्या योजनांपैकी एकही योजना दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेली नाही अशा प्रकारचे तीन अहवाल राज्य गुन्हा अन्वेषण कार्यालयाने पोलिस महासंचालकांकडे सादर केल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अहवालाच्या अनुषंगाने शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-०७-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई शहरात टॅक्सी चालक जवळचे भाडे नाकारत असल्याबाबत**

**(४) ३६४५७ (२०-०१-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात टॅक्सी चालक जवळचे भाडे नाकारत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे नागरीकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२८-०६-२०१७) :**(१) मुंबईतील काही टॅक्सीचालक जवळचे भाडे नाकारतात, असे निदर्शनास आले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) टॅक्सीचालकांविरुध्द तक्रारी करण्यासाठी नागरिकांना १८०० २२० ११० हा टोल फ्री क्रमांक उपलब्ध करुन दिला आहे. या टोल फ्री क्रमांकावर तसेच ई-मेलद्वारे / लेखी तक्रार प्राप्त झाल्यावर अशा टॅक्सी चालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येते व अनुज्ञप्ती निलंबनाची कारवाई करण्यात येते.

एप्रिल ते डिसेंबर, २०१५ या कालावधीत मुंबईमधील ३ प्रादेशिक परिवहन कार्यालयांकडे अशा एकूण ३६९ तक्रारी प्राप्त झाल्या. या प्रकरणांमधील दंडात्मक कारवाईतून एकूण रु.२,५३,८०० इतका दंड वसूल झाला.

तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई मध्य यांनी २४० प्रकरणांमध्ये संबंधीत टॅक्सी चालकांना परवाना निलंबनाच्या नोटीसा पाठविल्या आहेत. मुंबई पूर्व व मुंबई पश्चिम या दोन प्रादेशिक परिवहन कार्यालयांनी मिळूण ४१ परवाने निलंबित केले आहेत. तसेच, सदरच्या तीनही कार्यालयांनी मिळूण एकूण २१७ अनुज्ञप्ती निलंबीत केल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परिवहन व महापालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या संगनमताने होत असलेली जकात चोरी रोखण्याबाबत**

**(५) ४४२७४ (२८-०४-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील महागड्या व आलिशानगाड्यांची नोंदणी ठाणे प्रादेशिक व उपप्रादेशिक कार्यालयात बनावट पत्ते व कागदपत्राच्या आधारे, नोंदणी करुन, मुंबई महापालिकेची कोट्यवधी रुपयाची जकात चोरी करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, परिवहन अधिकारी व पालिका कर्मचाऱ्यांच्या संगनमताने माहे नोव्हेंबर, २०१५ अखेरपर्यंत किती गाड्यांची नोंदणी केल्याची प्रकरणे निदर्शनास आली आहे व त्यानुसार किती वाहन मालकांविरुध्द गुन्हे दाखल करुन त्यांच्याकडून जकात चोरीची रक्कम शासनाने वसूली केली आहे,
(४) तसेच, परिवहन व महापालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या संगनमताने होत असलेली जकात चोरी रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केल वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-०७-२०१७) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.

मध्यवर्ती गुन्हे शोध कक्ष, गुन्हे शाखा, ठाणे यांचे दि. ११.१२.२०१५ च्या पत्रान्वये विदेशी जग्वार, वाहन क्र.एमएच ०४ एफएम ०००९ या वाहनाची नोंदणी खोट्या पत्त्यावर झाल्याचे कळवून वाहनाच्या मुळ कागदपत्रांची मागणी केली होती. त्यानुसार मुळ कागदपत्रे पुरविण्यात आली आहेत. सदरहू वाहनांची नोंदणी दिनांक १५.०३.२०१२ रोजी झाली होती. याप्रकरणी ठाणे नगर पोलीस स्टेशन गुन्हा रजि.क्र. २२२/२०१५ भादंविस कलम ४२०, ३४ नुसार पोलीसांनी गुन्हा नोंदविलेला आहे.
(३) वाहनांची नोंदणी मोटार वाहन कायदा, १९८८ च्या तरतुदीनुसार करण्यात येते. तथापि, खोटे पत्ते देऊन वाहने नोंद केल्याचे निदर्शनास आल्याने ठाणे नगर पोलीस ठाणे ४१ वाहनांबाबत गुन्हा दाखल केला होता. महानगरपालिकेमार्फत जकातीपोटी रु. ४,४४,९३७/-इतकी वसुली करण्यात आली आहे.
(४) खोट्या पत्त्यावर वाहनांची नोंदणी होऊ नये म्हणून मोटार वाहन कायद्यातील नियम ४ मध्ये नमूद केलेले पत्त्याचे दोन पुरावे घेऊन वाहनांची नोंदणी करण्यात येते. तसेच जकात वसुल करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची असून महानगरपालिकेस नोंदणी केलेल्या वाहनांची माहिती दिली जाते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील प्रादेशिक परिवहन विभागात पसंती क्रमांकासाठी डीडीचा होत असलेला गैरव्यवहार

**(६) ५५७१५ (२४-०८-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील प्रादेशिक परिवहन विभागात वाहनांच्या पसंती क्रमांकाला मोठी मागणी असून वाहन मालकाना हा क्रमांक घेताना प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे कोणत्याही बँक खात्यातील डीडी असावा याबाबत कोणतेही बंधन नसल्याने एजंटकडून एकच डीडी अनेकांना विकला जात असल्याचे गैरप्रकार दिनांक २४ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील एजंटला दिलेल्या अनामत रक्कमेचा डीडी परत मिळविण्यासाठी वाहनमालकांनी अर्ज केला असता त्यांची पिळवणूक करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती पसंती क्रमांकासाठी डीडीचा गैरव्यवहार करणाऱ्या व नागरीकांची फसवणूक करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२०-०६-२०१७) :**(१) अशा आशयाची बातमी वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली होती.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रत्येक वाहनामालक अर्जदाराने स्वत:च्या बँक खात्यातून डीडी काढल्याने प्रतिज्ञापत्र घेण्यात येते व पसंती क्रमांक न मिळाल्यास अर्जदाराची खात्री करून लिलावाच्या ठिकाणीच डीडी परत करण्यात येतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मुंबईतील मालाड येथील मड गावात पातवाडी येथील जेट्टीच्या सुरक्षिततेबाबत

**(७) ५६५७० (२३-०८-२०१६). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालाड येथील मड गावात पातवाडी येथील मत्स्य व्यवसायासाठी कोळी समाजाला बांधुन देण्यात आलेली जेट्टी असुरक्षित असून समुद्राच्या लाटेमुळे वाहून जाण्याचा धोका निर्माण झाला असल्यामुळे जेट्टीला दगडांची सुरक्षा देण्याबाबतची मागणी करणारे निवेदन लोकप्रतिनीधींनी व कोळी बांधवांनी शासनास वारंवार दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने जेट्टीच्या सुरक्षिततेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (११-०७-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) जेट्टीच्या सुरक्षिततेसाठी धूप प्रतिबंधक बंधा-याचे बांधकाम पूर्णत्वास आलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### शाहुवाडी तालुक्यातील कासारी खोऱ्यात फलोद्योग प्रकल्प राबविणेबाबत

**(८) ५८५२० (२०-०८-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाहुवाडी तालुक्यातील कासारी खोऱ्यातील मुलांची सुट्टी वार्षिक शिक्षणाचा खर्च व आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह करण्यात हातभार लावण्यासाठी जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भागातील मुलांना आपला वार्षिक खर्च भागविण्यासाठी डोंगरातील रानमेव्यावर अवलंबून राहावे लागते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर भागात शासनाने फलोद्योग राबविल्यास मुलांना व्यवसायाची संधी मिळू शकेल, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शाहुवाडी तालुक्यातील कासारी खोऱ्यात फलोद्योग राबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१२-०७-२०१७)** :(१), (२) व (३) अंशत: खरे आहे.
(४) कासारी खोऱ्यामध्ये, रोहयो अंतर्गत फळपिकांची लागवड करण्यात आली असून, फळ प्रक्रीयाबाबतचे प्रशिक्षण काही लाभार्थ्यांना देण्यात आले आहे. तसेच, राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत काजू प्रक्रीया केंद्रासाठी सन २००९-१० मध्ये रु. ०.५६ लाख व सन २०१४-१५ मध्ये रु. ६.२८ लाख अनुदान मंजूर करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भंडारा जिल्ह्यासाठी प्रधानमंत्री पिक विमा योजने करिता ५० पैशाच्या आत आणेवारी असलेल्या गावातील शेतकऱ्यांना विम्याचा लाभ मिळणेबाबत**

**(९) ६३८५३ (२०-०८-२०१६). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रधानमंत्री पिक विमा योजने करिता भंडारा जिल्ह्यासाठी विमा कंपनी निश्चित करून, सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षातील ५० पैशाच्या आत आणेवारी असलेल्या गावातील शेतकऱ्यांना विम्याचा लाभ मिळाला नसून, याबाबत स्थानिक लोकप्रतीनिधिनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २३ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती शासनाने मागील वर्षीची पीकविम्याची रक्कम अदा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाचे कारण काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२०-०६-२०१७) :**(१) (२) व (३) मा.लोकप्रतिनिधीकडील निवेदन प्राप्त झाल्याचे सकृतदर्शनी दिसत नाही. मात्र, सन २०१५-१६ या वर्षात राष्ट्रीय कृषि विमा योजना (NAIS)राबविण्यात आलेली असून, या योजनंतर्गत निश्चित करण्यात येणारी नुकसान भरपाई ही केंद्र शासनाने निर्धारित केलेल्या पध्दतीने पिक कापणी प्रयोगांव्दारे प्राप्त सरासरी

उत्पन्नाच्या आधारेच निश्चित केली जात असे. शासनाने जाहीर केलेल्या इतर कोणत्याही निकषांचे आधारे अर्थात पिक पैसेवारी, टंचाईसदृष्य परिस्थिती, पूर इत्यादि नुकसान भरपाई निश्चित केली जात नव्हती.

खरीप हंगाम २०१५ ची नुकसान भरपाई भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत निश्चित करण्यात आली होती. भंडारा जिल्हयातील १२४५४ सहभागी शेतकऱ्यांपैकी ४५४ शेतकऱ्यांना रक्कम रु.४.२८ लाख नुकसान भरपाई योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार निश्चित करण्यात आली होती.ती संबंधित बँकामार्फत शेतकऱ्यांना अदा करण्यात आली आहे.

प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप हंगाम २०१६ पासून राज्यात राबविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## मुंबई ते डहाणू दरम्यान खोल समुद्रात आढळलेले थर

**(१०) ६५०३३ (२१-१०-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई ते डहाणू दरम्यान खोल समुद्रात सुरु असलेल्या तेल आणि वायू संशोधनाच्या साईस्मिक सर्व्हे करताना समुद्राच्या तळाशी एअर गन्समधून सॉनिक लहरी सोडल्या जात असल्याने, या लहरींचा आवाज जेट इंजिनच्या आवाजापेक्षा मोठा असल्याकारणाने या आवाजाने समुद्रात मृत होणा-या माशांचे थर आढळून आले आहेत हे खरे आहे काय,

(२) तसेच गेल्या ३ महिन्यात केलेल्या सर्वेक्षणामुळे ३२ डॉल्फिन माशांचा मृत्यू मुंबई ते डहाणू दरम्यान समुद्रात झाल्याचे दिनांक २८ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे जानेवारी, २०१५ पासून सुरु झालेल्या या सर्वेक्षणामुळे गेल्या ५ महिन्यात मोठ्या प्रमाणात मासळी नष्ट व स्थलांतरीत झाली असल्याने, या सर्वेक्षणाला शासनाने बंदी घालावी अशी मागणी मच्छिमार संघटनांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सर्वेक्षणाला बंदी घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (११-०७-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) गेल्या ३ महिन्यात केलेल्या सर्वेक्षणामुळे ३२ डॉल्फिन माशांचा मृत्यू मुंबई ते डहाणू दरम्यान समुद्रात झाल्याचे दिनांक २८ मे २०१५ रोजी व त्या दरम्यान निदर्शनास आलेले नाही. तथापि मुंबई उपनगर जिल्हयात १ डॉल्फिन मासा मृतावस्थेत आढळून आला तथापि हा मृत्यू सर्वेक्षणामुळे आल्याबाबत ठोस पुरावे नाहीत.

(३) नाही, हे खरे नाही.
(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे खासापुरी (ता.परांडा,जि.उस्मानाबाद) येथील नागरिकांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(११) ६६०४९ (०२-०१-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खासापुरी (ता.परांडा, जि.उस्मानाबाद) येथील खासापुरी मध्यम प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या सर्व कुटुंबांचे पुनर्वसन करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.मदत व पुनर्वसन मंत्री यांच्याकडे दिनांक १८ ऑक्टोबर,२०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०७-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) खासापुरी मध्यम प्रकल्पाचे काम १९५६ साली पुर्ण झाले. खासापुरी प्रकल्पामध्ये परंडा तालुक्यातील आंदोरा, अंदोरी व राजुरी ही गावे बुडीत क्षेत्रात येत असल्याने या गावांचे पुनर्वसन त्यावेळी करण्यात आलेले आहे. मी खासापुरी हे गाव बुडीत क्षेत्रात येत नसल्याने मौ.खासापुरी गावाचे पुनर्वसन करण्यात आलेले नाही.
धरण पुर्ण झाल्यावर १९५७ साली मोठया प्रमाणावर पाऊस पडुन प्रकल्पाचा सांडवा फुटल्यामुळे मौ.खासापुरी गावठाणामध्ये पाणी आले. त्यामुळे गावक-यांनी जुन्या गावठाण पासुन सर्वे नं.३९ मधील १५ एकर क्षेत्रात वसाहत केली सदर जमीन खाजगी मालकीची होती. सदर व्यवहार हा खाजगी मालक व गावकरी यांच्यामधील खाजगी व्यवहार आहे. त्यामुळे या जमीनीची भूसंपादन प्रक्रीया करता येणार नाही. सध्या स.नं.३९ ब मध्ये वस्ती झालेली असल्याने सध्या तरी अतिरिक्त जमीन संपादनाची आवश्यकता नाही. ग्रामपंचायत खासापुरी यांनी ०५/११/२०१६ रोजी ग्रामसभा घेऊन ठराव क्र.२ व्दारे सदर जमीन शासनाकडुन संपादित करण्याची विनंती केली होती. त्या अनुषंगाने तहसिलदार परंडा यांनी त्यांचे पत्र दि.१९/११/२०१६ अन्वये गट विकास अधिकारी परंडा यांना सविस्तर उत्तर दिले असुन ग्रामसभेचा ठराव नियमबाहय जाहीर करण्याबाबत कळविलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यातील एसटी बसेसवर GPS यंत्रणा व CCTV बसविण्याबाबत

**(१२) ६६७९२ (१६-१२-२०१६). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यातील एसटी बसेस वर GPS यंत्रणा व CCTV बसविण्याची योजना महामंडळाने योजिली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच चालक, वाहक यांच्या नियमित आरोग्य तपासण्या करण्याचीही योजना आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतीत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यातील एसटी बसेस वर GPS यंत्रणा व CCTV बसविण्याबाबत तसेच चालक, वाहक यांच्या नियमित आरोग्य तपासण्या करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०६-२०१७) :**(१) व (२) होय.

(३) व (४) राज्य परिवहन महामंडळाच्या बसेंसवर जी.पी.एस यंत्रणा व सी.सी.टी.व्ही. यंत्रणा बसविण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरु केली आहे. तसेच, चालक व वाहक यांची आरोग्य तपासणी करण्यात आली असून, राज्य परिवहन महामंडळातील बसेसची नियमित तपासणी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील आरटीओकडे सन २०११-१२ ते २०१५-१६ या ५ वर्षाच्या कालावधीत एकुण १४ हजार ९४७ तक्रारींची नोंद झाल्याबाबत

**(१३) ६७०११ (१६-१२-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अंधेरी, ताडदेव व वरळी या तिन्ही आरटीओकडे सन २०११-१२ ते २०१५-१६ या ५ वर्षाच्या कालावधीत एकुण १४ हजार ९४७ तक्रारींची नोंद झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती वरीलपैकी तक्रारींचे निराकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-०७-२०१७)** :(१) मुंबईतील अंधेरी, ताडदेव व वरळी या तिन्ही आरटीओकडे सन २०११ ते २०१६ या कालावधीत एकूण १२,८२३ तक्रारी नोंद झाल्या आहेत.
(२) व (३) सदर नोंद झालेल्या तक्रारींपैकी १०४८१ तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुण्यासह महाराष्ट्रातही "सर्ज प्राइसिंग" वर बंदी घालण्याबाबत तसेच नियमावलीचा मसुदा अंतिम करण्याबाबत**

**(१४) ६७३३२ (१६-१२-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात ओला, उबेर सारख्या अग्रीगेटर टॅक्सी सेवेचे नियमन करण्यासाठी "सिटी टॅक्सी स्किम, २०१५" ही नियमावलीतील प्राप्त सूचनांनुसार सुधारीत केलेला नियमावलीचा मसुदा अंतिम करण्यासाठीची कार्यवाही संथ गतीने सुरू असल्याचे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ओला, उबेर सारख्या अग्रीगेटर टॅक्सी कडून विशेषतः गर्दीच्या वेळेत हमखास दुप्पट किंवा तिप्पट भाडे आकारणी सुरू झाले हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिल्ली आणि कर्नाटक सरकारच्या धर्तीवर पुण्यासह महाराष्ट्रातही "सर्ज प्राइसिंग" वर बंदी घालण्याबाबत तसेच नियमावलीचा मसुदा अंतिम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०३-०७-२०१७)** :(१), (२) व (३) समुच्चयक कंपन्याद्वारे चालविण्यात येणाऱ्या संकेतस्थळ आधारीत टॅक्सी सेवांबाबत सेवेचे विनियमन करण्यासाठी दि.०४.०३.२०१७ च्या अधिसूचनेन्वये महाराष्ट्र सिटी टॅक्सी नियम, २०१७ विहित करण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी शहर व ग्रामीण भागातील शाळेमध्ये विद्यार्थ्यांची खाजगी वाहनांमधून बेकायदेशिरपणे वाहतूक होत असल्याबाबत**

**(१५) ६७७४५ (१४-०१-२०१७). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी शहर व ग्रामीण भागात मराठी, हिंदी, उर्दू व इंग्रजी या शाळेतील बालवाडी ते पाचवीपर्यंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची बेकायदेशिरपणे व धोकादायकरित्या खाजगी वाहनांमधून वाहतूक सुरु असून याप्रकरणी ठाणे प्रादेशिक परिवहन विभागाकडून सहा वाहनांवर माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान कारवाई केली, हे खरे आहे काय,

(२) तसेच नियमानुसार पिवळ्या रंगाच्या वाहनांमधून विद्यार्थ्यांची वाहतूक करणे आवश्यक असतानाही खाजगी रिक्षा, काळीपिवळी ओम्नी, विविध रंगाच्या कार व जीपमध्ये वाजवीपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना कोंबून अवैधरित्या वाहतूक सुरु असल्याची घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) नसल्यास, चौकशीअंती अवैध वाहतूकदारांवर कारवाई करण्याबाबत तसेच या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२८-०६-२०१७) :**(१) व (२) सप्टेबर,२०१६ मध्ये भिंवडी व परिसरात प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे व ठाणे शहर वाहतूक पोलीस, यांनी विद्यार्थी वाहतूकी संदर्भात विशेष तपासणी मोहिम आयोजित करण्यात आली, त्यामध्ये दोषी आढळलेल्या ३६ वाहनांवर कारवाई करण्यात आली.

(३) व (४) शालेय विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांची वेळोवेळी परिवहन विभागामार्फत तसेच स्थानिक वाहतूक पोलीस विभागाच्या साह्याने तपासणी केली जाते. तसेच तपासणी दरम्यान आढळलेल्या दोषी वाहनांवर मोटार वाहन कायद्यातील तरतूदींच्या आधारे दंडात्मक तसेच निलंबनात्मक कारवाई केली जाते. प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे यांनी ठाणे शहरात सन २०१६ पासून जानेवारी २०१७ पर्यंत २९७८ वाहने तपासून ५०७ दोषी वाहनांवर कारवाई केली आहे. त्यांच्याकडून रु. १९,७४,३५० एवढा दंड वसूल केला असून २०२ वाहनांचे परवाने निलंबीत करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय दुग्धशाळांचे पुनर्गठन व्हावे आणि शासकीय आरे दुध योजना कार्यान्वित करण्याबाबत**

**(१६) ६८१२५ (१६-१२-२०१६). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय दुग्धशाळांचे पुनर्गठन व्हावे आणि शासकीय आरे दुध योजना कार्यान्वित व्हावी अशी मागणी एका संघटनेने मा.पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्यविकासमंत्री यांच्याकडे मागणी केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वयंरोजगार व्यावसायिक म्हणून आरे केंद्र चालकांना मान्यता देऊन व्यावसायिक सुविधा द्याव्यात अशी मागणीही केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त मागणीवर शासनाने निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२९-०६-२०१७) :**(१) होय.

(२) होय.

(३) प्रश्न भाग-१ बाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

प्रश्न भाग-२ बाबत शासन निर्णय दिनांक १०.७.२०११ व दिनांक २७.७.२०११ नुसार दूध केंद्र वाटप करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मध्यमुंबई प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत वाहनाच्या फिटनेस चाचणीसाठी २५० मीटरचे टँक उभारणीसाठी वरळी डेअरी येथील जागेचा प्रस्ताव**

**(१७) ६८६६२ (१६-१२-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मध्यमुंबई प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत वाहनाच्या फिटनेस चाचणीसाठी २५० मीटरचे टँक उभारणीसाठी आयुक्त परिवहन यांचेकडे वरळी डेअरी येथील जागेचा प्रस्ताव माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाचा अंतिम निर्णय झाला आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-०७-२०१७) :**(१) होय.

(२) मा.उच्च न्यायालयातील प्रकरण विचारात घेऊन ब्रेक टेस्ट ट्रॅक बांधकामासाठी जागा उपलब्ध करण्याबाबत दुग्धविकास विभागाच्या अधिका-यांसोबत बैठक घेतली असता सदर बैठकीत वरळी डेअरीमध्ये दुध संकलनाचे काम सुरु असल्याने ब्रेक टेस्ट ट्रॅकसाठी जागा देता येणार नाही असे दुग्धविकास विभागाने कळविले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई-पुणे एक्सप्रेस रस्त्यावर छोट्या वाहनांना आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसना टोलमाफी देण्याबाबत**

**(१८) ६९०७६ (१७-१२-२०१६). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील सजग नागरी मंचचे विवेक वेलणकर यांनी माहितीच्या अधिकारात मिळविलेल्या माहितीनुसार यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गावरुन प्रवास करणाऱ्या रा.प.मंडळाच्या सर्व बसेसना टोलमध्ये सवलत असल्याचे परिवहन मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिल्याची बाब दिनांक २६ ऑगस्ट, २०१६ रोजी निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्गावर टोल वसुल करणाऱ्या कंपनीने दिनांक १ एप्रिल, २००२ पासून आतापर्यंत २० कोटी रुपयांपेक्षा जास्त टोल बेकायदेशीरपणे वसूल केल्याची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, टोल वसूल करणाऱ्या आयआरबी कंपनीने करारात ठरल्याप्रमाणे १ एप्रिल, २००२ पासून एसटी ला दिलेली सवलत दोन्ही टोल नाक्यांवर देण्यात सुरुवात न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, मा.परिवहन मंत्री यांच्या निदर्शनास ही बाब आणून दिल्यानंतर परिवहन मंत्री यांनी आयआरबी कंपनीकडे त्यांनी जादा व बेकायदेशीरपणे वसूल केलेली २० कोटी रक्कम व्याजासह परत करण्याची मागणी केली आहे काय, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, आयआरबी कंपनीने करारात नमूद केल्याप्रमाणे बेकादेशीरपणे जास्तीचा टोल एसटीकडून वसुल करुन करारातील अटींचा भंग केल्याबद्दल त्यांचेविरुध्द मा.परिवहन मंत्री फसवणूकीचा गुन्हा दाखल करणार आहेत का,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०६-२०१७) :**

(१) दिनांक २१.१०.२०१५ रोजी वर्तमान पत्रातील मुंबई-पुणे महामार्गावर टोल वसुलीत "एस.टी.ला २० कोटीला चुना" या मथळयाखाली बातमी प्रसिध्द झाली होती.

(२) नाही.

(३), (४) व (५) दि.२१.१०.२०१५ रोजी वर्तमान पत्रातील मुंबई-पुणे महामार्गावर टोल वसुलीत "एस.टी.ला २० कोटीला चुना" या मथळयाखाली प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने मुंबई-पुणे महामार्गावरील टोलबाबत शासन व आय.आर.बी. कंपनी यांच्यात टोल वसुलीसाठी झालेल्या कराराच्या मसुद्यामध्ये राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसना टोल आकारणी करण्याबाबत सवतलीची तरतूद होती. तथापि, शासनाकडून निर्गमित झालेल्या अधिसूचनेमध्ये अशा प्रकारची सवलतीची तरतूद करण्यात आली नाही.

राज्य परिवहन महामंडळाने दि.०२.०४.२०१६ रोजी पथकराची जादा रक्कम परत मिळविण्याकरीता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे प्रस्ताव सादर केला असता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने एस.टी. महामंडळासाठी पथकर दराची वेगळी आकारणी नसल्याचे दि.०८.०६.२०१६ रोजी कळविले आहे.

त्यामुळे राज्य परिवहन महामंडळाकडून शासन अधिसूचनेनुसार टोल वसूल केला जात आहे. जास्त/अधिक टोल वसूल केला जात नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भामा आसखेड धरण प्रकल्पग्रास्ताचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(१९) ७१७४१ (१६-१२-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भामा आसखेड (जि.पुणे) धरण प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांमधील ६५% रक्कम कपात केलेल्या १११ शेतकऱ्यांना पर्यायी जमीन मिळण्याचा प्रस्ताव मंजूर असून प्रकल्पग्रस्त शेतकरी श्री.भागुजी राघुजी नवले या शेतकऱ्याला ६५% रक्कम कपात करूनही पर्यायी जमीन मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.भागुजी राघुजी नवले या शेतकऱ्याने पर्यायी जमीन मिळण्यासाठी जिल्हाधिकारी व जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांच्याकडे मागणी अर्ज केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती श्री.भागुजी राघुजी नवले या शेतकऱ्याला पर्यायी जमीन मिळण्यासाठी तसेच प्रकल्पग्रस्तांमधील ६५ % रक्कम कपात केलेल्या १११ शेतक-यांना पर्यायी जमीन मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-०६-२०१७) :**(१) होय.

भामा आसखेड प्रकल्पग्रस्त श्री. भागुजी राघुजी नवले यांना अद्‍याप पर्यंत पर्यायी जमीन देण्यात आलेली नाही.

(२) व (३) होय, हे खरे आहे,

अर्जदारास दि. २१/०९/२०१० व तद्‍नंतर पुन्हा दि. ०२/११/२०१२ व दि. १०/१०/२०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते.

(४) भामा आसखेड प्रकल्पातील पात्र १११ प्रकल्पग्रस्तांपैकी ११० खातेदारांना जमिन वाटप केली असुन श्री. भागुजी राघुजी नवले यांचे प्रकरणी त्यांची जमीन मागणीची विनंती अमान्य केलेनंतर त्यांनी मा. उच्च न्यायालयामध्ये याचिका क्र. ११८०७/२०१३ अन्वये दाखल केली होती. सदर याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. ०८/०२/२०१६ रोजी आदेश दिलेला असून सदर आदेशांप्रमाणे प्रकल्पग्रस्त श्री. भागुजी राघुजी नवले यांचे प्रकरणी कार्यवाही करणेत येत आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**शाहुवाडी (जि.कोल्हापूर ) तालुक्यातील अनियमित बस सेवा व निवारा शेड नसल्यामुळे प्रवाशांची व विद्‍यार्थ्यांची होत असलेली गैरसोय**

**(२०) ७३८६० (१७-०४-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विशाळगड (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) येथून विशाळगड-बेळगाव हि गडावरून खाली येणारी शेवटची बस असून बस वेळेपूर्वीच सुटत असल्याने विद्यार्थ्यांना वेळेपूर्वीच शाळेतून बाहेर पडावे लागत असून त्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, शाहुवाडी तालुक्यातील पश्चिम भागात अतिवृष्टी, सुसाट वारा, व दाट धुके असल्याने सदर भागातील अनेक गावात, वाड्या वस्त्यांवर निवारा शेडची सोय नसुन विद्यार्थ्यांची व प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने शाहुवाडीच्या पश्चिम भागातील लोकांच्या सोयीकरिता निवारा शेड बांधण्याकरीता तसेच प्रवाशांचे गैरसोय व शैक्षणिक विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०३-०७-२०१७) :**(१) नाही.

(२) राज्य परिवहन कोल्हापूर विभागाद्वारा मलकापूर आगारामार्फत विशाळगड-कोल्हापूर मार्गावर दैनंदिन ४ फेऱ्या व इतर आगारामार्फत ६ फेऱ्या अशा एकूण १० फेऱ्या चालनात आहेत. विशाळगड येथून सूटणारी १६.३० वाजताची विशाळगड-बेळगांव ही शेवटची फेरी असून ती नियमितपणे नियोजित वेळेस मार्गस्थ होते.

(३) प्रवाशांच्या सेवेसाठी शाहूवाडी तालुक्यात मागणीनुसार आवश्यक राज्य परिवहन निवारे बांधण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्यात बैलगाडी शैर्यतीस मान्यता देण्याबाबतची मागणी**

**(२१) ७३९१० (१३-०४-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तामिळनाडू मधील जलीकट्टू खेळास केंद्र सरकारने अध्यादेशाद्वारे मान्यता दिल्यानंतर महाराष्ट्र राज्यातही बैलगाडी शैर्यतीस मान्यता देण्याची मागणी विविध क्रिडा संघटना व लोकप्रतिनिधींनी शासनाकडे माहे जानेवारी, २०१७ अखेरीस केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२९-०६-२०१७) :**(१) होय.

(२) व (३) या संदर्भात केंद्र शासनाच्या **प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध अधिनियम, १९६०** मध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याबाबतचे विधेयक, सन २०१७ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये विधीमंडळाने संमत केले असून, सदर विधेयक मा.राष्ट्रपती महोदयांच्या संमतीसाठी पाठविण्यात आले आहे.

---

**राज्यातील एसटी कामगारांच्या प्रलंबित मागण्यांबाबत**

**(२२) ७३९६६ (१२-०४-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एसटी कामगारांनी नवीन वेतन करार अमलात आणावा, सातवा आयोग लागू करावा, १ एप्रिल २०१६ पासून २५ टक्के अंतरिम वाढ लागू करावा तसेच वेतन सुधार समितीला फेब्रुवारी, २०१७ पर्यंत मुदतवाढ अशा इतर अन्य विविध मागण्यासाठी एसटी कर्मचारी संघटनांकडून काढण्यात आलेल्या मोर्चाची दखल घेत मा. परिवहन मंत्री यांनी चर्चा करुनही कोणताच तोडगा निघाला नसल्याने एसटी कामगारांनी माहे जानेवारी, २०१७ मध्ये मंत्रालयावर मोर्चाचे आयोजन केले आहे,हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील एसटी कामगारांचे प्रश्न सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१९-०७-२०१७) :**(१) हे खरे आहे.

महाराष्ट्र एस.टी. कामगार संघटनेने दिनांक २०.०१.२०१७ रोजी मंत्रालयावर धडक मोर्चाबाबतची नोटीस दिली होती. परंतू, संघटनेने दिनांक २०.०१.२०१७ रोजीचा धडक मोर्चा स्थगित केलेला होता. त्यानंतर दिनांक २२.०३.२०१७ रोजी अर्थसंकल्पिय अधिवेशनाच्यावेळी आझाद मैदान, मुंबई येथे संघटनेतर्फे धरणे आंदोलन करण्यात आले होते.

(२) राज्य परिवहन महामंडळात महाराष्ट्र एस.टी. कामगार संघटना ही मान्यताप्राप्त संघटना असून या संघटनेबरोबर दर चार वर्षांनी कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्त्याबाबत कामगार करार केला जातो. सन २०१२ ते २०१६ या कालावधीच्या कामगार कराराची मुदत दि.३१.०३.२०१६ रोजी संपुष्टात आल्यामुळे दि.०१.०४.२०१६ पासून सुरु होणाऱ्या सन २०१६ते २०२० या नविन कामगार कराराकरीता महामंडळाच्या दिनांक ०९.०८.२०१६ रोजीच्या ठरावांन्वये वाटाघाट समिती नेमलेली आहे. सदर वाटाघाट समिती व मान्यताप्राप्त संघटना यांचेमध्ये संघटनेच्या मागण्यांबाबत वाटाघाट सुरु आहे.

राज्य परिवहन महामंडळात यापुर्वी कोणताही वेतन आयोग लागू केलेला नाही. राज्य शासनानेही राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना अद्याप ७ वा वेतन आयोग लागू केलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पांतर्गत पशुधन आधार सेवा प्रकल्पाचे काम फक्त १२ जिल्हयात सुरु असून उर्वरित जिल्हयात या योजना राबविण्याबाबत**

**(२३) ७५७३३ (१३-०४-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पांतर्गत पशुधन आधार सेवा प्रकल्पाला सन २०१६-२०१७ या वर्षासाठी ९ कोटी १३ लाख रुपयांचा निधी शासनाने मंजुर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील फक्त १२ जिल्हयात उक्त प्रकल्पाचे काम सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने उर्वरित जिल्हयात उक्त योजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२९-०६-२०१७) :**(१) हे अंशत: खरे असून सन २०१६-१७ मध्ये या प्रकल्पासाठी रु. १.६३ कोटी निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) जागतिक बँकेच्या निर्देशानुसार या प्रकल्पाच्या अंमलबजावणीअंतर्गत महाराष्ट्रातील केवळ अहमदनगर, यवतमाळ, अमरावती, वाशिम, बुलडाणा, नागपूर, सोलापूर, सातारा, पुणे, धुळे, जळगांव, कोल्हापूर, नाशिक, भंडारा, गोंदिया आणि बीड या एकूण १६ जिल्हयांमधील २० मोठया जनावरांचे बाजार व ४ शेळया-मेंढयांच्या बाजारांचे आधुनिकीकरण करावयाचे असल्याने सुरुवातीला हे १६ जिल्हे निवडण्यात आले होते. उपरोक्त जिल्हयांपैकी गोंदिया जिल्हयामध्ये मोठया जनावरांच्या बाजारासाठी पुरेशी जागा उपलब्ध न झाल्यामूळे तसेच, नागपूर जिल्हयातील सावनेर येथे अंतिम निवड झालेल्या कंत्राटदारास बाजार समिती, सावनेर यांनी स्विकृती पत्र न दिल्यामुळे सदर बाजाराची निवड रदद करण्यात आलेली आहे. तसेच, जळगांव व सोलापूर या जिल्हयांमध्ये प्रकल्पांतर्गत आयोजीत करावयाच्या आरोग्य शिबिरांचे उद्दीष्ट पूर्ण झाल्याने हे दोन व गोंदिया व नागपूर असे ४ जिल्हे वगळून सद्यस्थितीत सदरचा प्रकल्प उर्वरित १२ जिल्हयांमध्ये राबविण्यात येत आहे.

जागतिक बँकेने सदरचा प्रकल्प उपरोक्त १६ जिल्हयांव्यतिरीक्त इतर जिल्हयांमधे राबविण्यास मान्यता प्रदान केली नसल्याने राज्यातील उर्वरित जिल्हयांमध्ये सदरचा प्रकल्प राबविण्यात आलेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेतकऱ्यांना अवजार खरेदीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२४) ७६०५३ (१४-०४-२०१७). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांना वस्तू ऐवजी थेट बँक खात्यात आधार क्रमांकाच्या नावाने अनुदान जमा करण्याचे आदेश राज्य शासनाच्या नियोजन मंत्रालयाने दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी खात्याच्या पारंपारिक धोरणानुसार शेतकऱ्यांना खुल्या बाजारातून अवजार खरेदीची मुभा देण्यात आली नसल्यामुळे अगोदरच्या करारानुसार कृषी उद्योग विकास महामंडळामार्फत खरेदीची सक्ती करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे कृषी उद्योग विकास महामंडळामार्फत राज्यातील शेतकऱ्यांसाठी वाटल्या जाणा-या १०० कोटी रुपयांच्या अवजार खरेदी वरुन वाद निर्माण झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आली असून शेतकऱ्यांना अवजारे खरेदी करण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले

(५) असल्यास, त्यानुसार अवजार खरेदीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१४-०७-२०१७) :**(१) होय.

(२) कृषि विभागाच्या दि.२१.१.२०१७ च्या आदेशाने कृषि विभागाद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध केंद्र व राज्य योजनांतर्गत अनुदानावर वाटप करावयाच्या कृषि औजारासंदर्भात थेट लाभ हस्तांतरण योजना Direct Benefit Transfer अर्थात (DBT) लागू करण्यात आलेली आहे. त्यामुळे, आता शेतकऱ्यांनी महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाच्या माध्यमातूनच अवजारे खरेदी करणेबाबत कोणतीही अट नाही अथवा तशी खरेदीची सक्ती करण्यात येत नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या बसस्थानकाची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२५) ७६४३८ (१३-०४-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या बसस्थानकाची दुरवस्था झाली असल्याचे दिनांक २१ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू बसस्थानकाची दुरूस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०६-२०१७) :**(१) व (२) नाही.

(३) राज्य परिवहन महामंडळाचे नांदेड, बसस्थानक सुस्थितीत असून प्रवाशांसाठी नियंत्रण कक्ष, आरक्षण कक्ष, पार्सल कक्ष, उपहारगृह, चालक वाहक विश्रांतीगृह, स्थानक प्रमुख कक्ष, पिण्याच्या पाण्याची सोय, ग्रॅनाईट लावलेले आरसीसी बेंच, ग्रामीण बसेससाठी स्वतंत्र १० फलाटांची व्यवस्था, स्वतंत्र शटल सेवा व नियंत्रण कक्ष, सुलभ शौचालय (महिला व पुरुषांसाठी), रिक्षातळ, वाणिज्य आस्थापना लॉजसह इ.बसस्थानकावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोहाडी (जि.भंडारा) तालुक्यातील करडी परिसरातील शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पिक विमा योजनेचा लाभ मिळणेबाबत**

**(२६) ७६४९७ (१४-०४-२०१७). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहाडी (जि.भंडारा) तालुक्यातील करडी परिसरात पावसाअभावी धान पिकांची लागवड न केल्यामुळे शेतजमिनीचे पंचनामे करून प्रधानमंत्री पिक विमा योजनेचा लाभ मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतीनिधिनी मा.कृषी मंत्री यांना दिनांक २७ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणत चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाचे कारण काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१४-०७-२०१७) :**(१) होय

(२) प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप हंगाम २०१६ मध्ये राज्यात राबविण्यात आली. योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अपुरे पर्जन्यमान किंवा हवामान घटकांच्या प्रतिकूल परिस्थितीमुळे अधिसूचित मुख्य पिकांची अधिसूचित विमा क्षेत्र घटकातील पेरणी क्षेत्राच्या ७५ टक्के पेक्षा जास्त क्षेत्रावर उगवण न झाल्यास किंवा ७५ टक्के पेक्षा जास्त क्षेत्रावर पेरणी / लावणी न झाल्यास, योजनेंअतर्गत, पिक पेरणी / लावणीपूर्व नुकसान भरपाई या घटकांतर्गत,नुकसान भरपाई देय आहे.

तथापि, भंडारा जिल्ह्यातील करडी मंडळात भात पिकाचे मागील तीन वर्षाचे सरासरी क्षेत्र ५६६९.६६ हेक्टर आहे व खरीप २०१६ मध्ये ५३६.४० हेक्टर क्षेत्र नापेर राहिले आहे. म्हणजेच करडी मंडळात फक्त ९.४६ टक्के क्षेत्र नापेर राहिले. त्यामुळे योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सदर परिसरात नुकसान भरपाई देय होत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### कोकणातील पर्ससीन आणि पारंपारिक मच्छिमार यांच्या मागण्याबाबत.

**(२७) ७६६१२ (१३-०४-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील समुद्र किनारपट्टीवर पारंपारिक मासेमारी करणारे मच्छिमार आणि आधुनिकतेचा वापर करून मासेमारी करणारे पर्ससीन नेट धारक यांच्यातील असलेला व्यावसायिक संघर्ष गेल्या काही वर्षापासून सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास पावसाळी हंगामात पारंपारिक मासेमारी बंद असते, तर पर्ससीननेट धारक सर्व हंगामात मासेमारी करीत असतात, तसेच शासनाने व न्यायालयाने ठरवून दिलेल्या हद्दीपलीकडे येऊन पर्ससीननेट धारक मासेमारी करतात, याबाबत अनेक वेळा तक्रार करूनही बंदर व मत्स्यविभाग याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०१६ रोजी निदर्शनास आले आहे.

(३) असल्यास, पारंपारिक मच्छिमार व पर्ससीन नेट धारक यांच्यामधील संघर्ष कायमचा मिटविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०३-०७-२०१७) :**(१) होय.
(२) राज्याच्या किनाऱ्यापासून १२ सागरी मैलापर्यंतच्या निर्बंधीत क्षेत्रात व माहे जानेवारी ते ऑगस्ट दरम्यानच्या निर्बंधीत कालावधीमध्ये मासेमारी करताना आढळून आल्यास महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ च्या कलम १७ (१) अनुसार जप्त केलेल्या मासळीची विल्हेवाट लावून सदर गुन्हा वारंवार केल्यास कलम ८ (१) (ब) अनुसार परवाना निलंबित करण्याबाबतची दंडात्मक कार्यवाही करण्यांत येत असते.
(३) पारंपारीक मच्छिमार व पर्ससीन पध्दतीने मासेमारी करणारे मच्छिमार यांच्यात होणारा संघर्ष टाळण्यासाठी व तिचा अभ्यास करण्यासाठी डॉ.कै. व्ही. एस. सोमवंशी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीने दिनांक १०.५.२०१२ रोजी सादर केलेल्या अहवालातील शिफारसीनुसार दिनांक ५.२.२०१६ अन्वये शासन अधिसूचनेद्वारे जलधीक्षेत्रात काही निर्बंधीत क्षेत्राबाहेर माहे सप्टेंबर ते डिसेंबर या कालावधीमध्ये आणि इतर वेळेस राज्याच्या जलधिक्षेत्रा बाहेर अटी व शर्तीच्या अधिन राहून पर्ससीन नेटद्वारे मासेमारी करण्यास दिनांक ५.७.२०१६ रोजीच्या शासन पत्राद्वारे नियमन करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जुन्नर-तांबे-बांबळेवाडी (जि.पुणे) बससेवा सुरू करण्याबाबत

**(२८) ७६९८८ (१३-०४-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मु.पो.बांबळेवाडी (ता.जुन्नर, जि.पुणे) हे वाहतुकीसाठी मुख्य मार्गावर असून आसपासच्या डोंगराळ अतिदुर्गम भागातील आदिवासी यांना बांबळेवाडी येथून प्रवास करणे सोईचे असल्यामुळे तसेच, बांबळेवाडी ते तांबे हे अंतर फार मोठे असल्यामुळे जुन्नर-तांबे ऐवजी जुन्नर-तांबे-बांबळेवाडी अशी बससेवा सुरू करण्याबाबतची मागणी ग्रामस्थानी शासनाकडे केली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(३) तद्नुसार जुन्नर-तांबे-बांबळेवाडी अशी बससेवा सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०६-२०१७)** :(१), (२) व (३) राज्य परिवहन महामंडळाद्वारे जुन्नर-तांबे अशा १६ फेऱ्या चालनात असून तांबे-बांबळेवाडी हा रस्ता नवीन बनविण्यात आला असून, सदर मार्गावर बसफेऱ्या सुरु करण्यासाठी मार्ग वाहतूकीस योग्य असल्याबाबतची खातरजमा महामंडळाद्वारे करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### संगमनेर (जि.अहमदनगर)तालुक्यात सातत्याने गोवंशाची हत्या होत असल्याबाबत

**(२९) ७७०७७ (१३-०४-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यामध्ये गोवंश हत्या बंदी कायदा लागू झालेला आहे, असे असतांना संगमनेर (जि.अहमदनगर) तालुक्यातील भारतनगरमध्ये सातत्याने गोवंशांची हत्या होत असल्याचे निदर्शानास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत एकूण किती प्रकरणे आढळून आली आहे,

(३) असल्यास, संगमनेरमध्ये गोवंशाची हत्या होऊ नये म्हणून तसेच, सदर कायद्याच्या कठोर अंमलबजावणीसाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करीत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२९-०६-२०१७)** :(१) होय.

(२) एकूण ६४ प्रकरणे आढळून आली आहेत.

(३) (१) संगमनेरमध्ये गोवंशाची कत्तल होऊ नये म्हणून पशुसंवर्धन विभागाकडून नगर परिषद संगमनेर, सहकारी साखर कारखाना कृषि उत्पन्न बाजार समिती, संगमनेर, पोलीस स्टेशन ग्रामीण व शहरी या ठिकाणी शासनाने महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारीत) अधिनियम, १९९५ बाबतची अद्ययावत माहितीदर्शक बॅनर लावले आहेत.

(२) तसेच सदर ठिकाणी संबंधीत लोकप्रतिनिधी, अधिकारी तसेच सर्वसामान्य नागरीक, गोपालक यांना सदर कायद्याची विस्तृत माहिती होण्यासाठी सभा आयोजित करून मार्गदर्शन करण्यात आले आहे.

(३) संगमनेरमध्ये गोवंशाची हत्या होऊ नये म्हणून पोलीस विभागाकडून या परिसरात पेट्रोलिंगची व्यवस्था करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सातपुर (जि.नाशिक) येथे अद्यावत बस स्थानक बांधण्याबाबत

**(३०) ७७२३० (१३-०४-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातपुर (जि.नाशिक) येथील महाराष्ट्र राज्य परीवहन महामंडळाच्या मालकीचे भू.क्र. ४७५/१ या जागेवर अद्यावत असे बस स्थानक बांधण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सदरहु जागेमध्ये अद्यायावत असे बस स्थानक बांधण्याच्या दृष्टीने शासनाने कोणत्या उपाययोजना केलेल्या आहेत वा करणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०४-०७-२०१७) :**(१) होय.
(२) सातपूर येथे लिंक रोडवर भू.क्र. ४७४ व ४७५ मधील १.६० हेक्टर जागेवर बसस्थानक बांधण्याची मागणी होती. परंतु, या जागेपासून २०० मीटर अंतरावरील एम.आय.डी.सी. प्लॉट क्र.पी-२८, सर्व्हे नं. १५९ येथील १.३५ हेक्टर जागा ही लोकांसाठी सोयीची असून ६ फलाटांचे सर्व सोयी सुविधांनी युक्त असे बसस्थानक बांधण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अरबी समुद्रात तेल सर्वेक्षणामुळे, डहाणू ते मढ पट्टयातील, मच्छीमारांवर बेकारीची व उपासमारीची वेळ आल्याबाबत.

**(३१) ७७६९० (१३-०४-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील अरबी समुद्रातील, डहाणू ते मढ या पट्टयात, केंद्र सरकारतर्फे तेल साठाचा शोध घेण्याकरीता सुरू असलेल्या सर्वेक्षणामुळे मुंबईसह मढ, मार्वे, उत्तन, वसई, पालघर व डहाणू या पट्टयातील हजारो मच्छीमारांवर बेकारीची व उपासमारीची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत १५ वर्षापासून अरबी समुद्रात सुरू असलेल्या सर्वेक्षणामुळे मच्छीमार संतप्त व त्रस्त झाले असताना, पुन्हा तीन महिने शासनाने सर्वेक्षण कालावधी वाढविण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, राज्य शासनाने सदरहू सर्वेक्षण कार्यवाही स्थगित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०३-०७-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रीय कृषी विकास योजनेतंर्गत केळी पिकांवरील करपा निर्मुलन कार्यक्रमांतर्गत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना मानधन न मिळाल्याबाबत**

**(३२) ७८१४४ (१९-०४-२०१७). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत केळी पिकांवरील करपा निर्मुलन कार्यक्रमांतर्गत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना मानधन न मिळाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंत्राटदाराने कार्यरत असलेल्या कर्मचा-यांकडून प्रति व्यक्ती १०,००० रुपये घेऊन बोगस भरती केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तदनुसार शासनाने कर्मचाऱ्यांना मानधन देण्याबाबत व सदर भ्रष्ट कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२२-०६-२०१७) :**(१) जळगांव येथे केळीवरील करपा रोग निर्मुलन कार्यक्रमाकरीता नेमण्यात आलेल्या काही क्षेत्रिय सहाय्यकांकडून अनियमित मानधन मिळत असल्या संदर्भात तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(२) त्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त नाही. तथापि, मनुष्यबळ पुरवठादार संस्थेच्या प्रतिनिधींकडून केळी करपासाठी रु.५०००/- व हॉर्टसॅपसाठी रु.१०,०००/- मागणी केल्याबाबत जळगाव येथील कीड सर्वेक्षकांनी कृषि सहसंचालक कार्यालयास कळविले आहे.

(३) व (४) सदर तक्रारीची शहानिशा केली असून आयएसएफ औरंगाबाद या मनुष्यबळ पुरवठादार संस्थेने क्षेत्रिय सहाय्यकांच्या वेतन अदायगीत अनियमितता केल्याचे आढळून आले आहे. सबब, धर्मादाय आयुक्त तसेच सहा. कामगार आयुक्त, नाशिक यांना सदर संस्थेची नोंदणी रद्द करणे तसेच संस्थेला काळया यादीत टाकण्याबाबत कळविले आहे, आणि संस्थेची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरोळ तालुक्यातील (जि.कोल्हापूर) सहा सर्कलची स्वयंचलित हवामान केंद्र उभारणी करण्याबाबत**

**(३३) ७८५०८ (१९-०४-२०१७). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरोळ तालुक्यातील (जि.कोल्हापूर) सहा सर्कलची स्वयंचलित हवामान केंद्र उभारणीची जागा निश्चित होऊन प्रस्ताव शासनाकडे दोन वर्षापूर्वी सादर झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर अद्यापपर्यंत निर्णय न घेण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावानुसार शासन सदर स्वयंचलित हवामान केंद्राची उभारणी कधीपर्यंत करणार व त्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२२-०६-२०१७)** :(१) नाही, तथापि, शासनाकडून शिरोळ तालुक्यातील (जि.कोल्हापूर) ७ महसूल मंडळामध्ये स्वयंचलित हवामान केंद्र उभारण्याचे नियोजीत आहे.
(२) व (३) राज्यात सर्व महसूल मंडळांमध्ये सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून बांधा-मालक व्हा-चालवा (BOO) तत्वावर स्वयंचलित हवामान केंद्र उभारण्यासाठी (महावेध प्रकल्प) मे.स्कायमेट वेदर सर्व्हिसेस प्रा.लि. यांची सेवा पुरवठादार संस्था म्हणून निवड करण्यात आली आहे. सदर प्रकल्पाची उभारणी प्रगतीपथावर आहे. लवकरच संपूर्ण राज्यात हवामान केंद्र प्रकल्पांची उभारणी पूर्ण होणे अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक त्र्यंबकेश्वर मार्गावरील संदीप पॉलिटेक्निक येथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना एस.टी. पासावर प्रवास करण्यास नाकारण्यात आल्याबाबत

**(३४) ७८५७४ (१३-०४-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक त्र्यंबकेश्वर मार्गावरील संदीप पॉलिटेक्निक येथे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना एस.टी.बसचा पास दिला असतानाही पासवर प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांना माहे जानेवारी, २०१७ पासून प्रवास नाकारण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनमार्फत चौकशी केली आहे काय,
(३) तदनुसार, पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांना बसच्या पासवर प्रवास करण्यास परवानगी देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०६-२०१७)** :(१) नाही.
(२) व (३) राज्य परिवहन महामंडळाच्या नाशिक-१ आगारामार्फत संदीप पॉलिटेक्निकच्या १०९३ विद्यार्थ्यांना पासेस वितरीत करण्यात आले आहेत. नाशिक ते संदीप पॉलिटेक्निक कॉलेज या मार्गावर सकाळी ७.३० ते २०.१५ पर्यंत १६ फेऱ्या चालविल्या जात आहेत, त्याचा लाभ विद्यार्थी व प्रवाशांना होत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जालना जिल्ह्याच्या एसटी महामंडळ विभागातील कालबाह्य व निकामी बसेसच्या सेवेबाबत**

**(३५) ७८६०१ (१३-०४-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महामंडळाकडून सुरक्षितता मोहिमेअंतर्गत मार्गदर्शनपर उपक्रम राबविले जात असताना जालना जिल्ह्यात महामंडळ विभागाअंतर्गत ४० टक्क्यांपेक्षा जास्त बसेस या कालबाह्य झाल्या असून ४५ टक्के बसेस निकामी झाल्या असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती निकामी बस सेवेमुळे निर्माण झालेला प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन कालबाह्य व निकामी बसेस सेवेतून काढून टाकण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०६-२०१७) :**(१) नाही.

(२) व (३) जालना विभागामार्फत सद्यस्थितीत १९९ नियते चालविण्यात येत असून त्याकरीता २७७ वाहने उपलब्ध आहेत. बसेसची देखभाल/दुरुस्ती राज्य परिवहन महामंडळाच्या देखभाल कार्यक्रमांतर्गत केली जाते. सन २०१४ ते २०१७ या तीन वर्षाच्या कालावधीत जालना विभागास ४४ नवीन वाहनांचा पुरवठा करण्यात आला असून, कालबाह्य व निकामी १५ गाड्या मोडीत काढण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंदगड तालुक्यातील (जि.कोल्हापूर) राज्य परिवहन बससाठी चालक व वाहकाअभावी प्रवासी वाहतुकीवर परिणाम होत असल्याबाबत**

**(३६) ७८६८७ (१७-०४-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड तालुक्यातील (जि.कोल्हापूर) राज्य परिवहन बससाठी चालक व वाहकाअभावी वाहतुकीवर परिणाम होत असल्याने चंदगड तालुक्यात एस.टी.बससाठी पुरेश्या प्रमाणात वाहनचालक देण्याची मागणी मा.परिवहन मंत्री यांचेकडे चंदगडचे लोकप्रतिनिधीनी माहे डिसेंबर, २०१६ च्या शेवटच्या सप्ताहात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०६-२०१७) :**(१) नाही.
(२) व (३) राज्य परिवहन महामंडळाच्या चंदगड आगारात २३ चालक/वाहकांची कमतरता आहे. सद्यस्थितीत राज्य परिवहन महामंडळाद्वारे १४,२५३ पदांची भरती प्रक्रिया सुरु असून, त्यामध्ये ७९२९ चालक तथा वाहक या पदाचा समावेश आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) तालुक्यातील ग्रामिण भागात परिवहन मंडळाची बस पोहोचत नसल्याने नागरीकांना होत असलेला त्रास**

**(३७) ७९१७६ (१७-०४-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) तालुक्यातील ग्रामिण भागात परिवहन मंडळाची बस पोहोचत नसल्याने विद्यार्थ्यांचे, शेतकरींचे, मजुरांचे, रूग्णांचे नुकसान होत आहे असे दिनांक २३ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, तद्नुसार संबंधीत परिवहन मंडळाच्या अधिकारींवर कारवाई करण्याबाबत व सदरहू ग्रामीण भागात बस ची सेवा पोहचण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) नांदगांव खंडेश्वर ग्रामीण भागात अमरावती चांदूररेल्वे, बडनेरा आगारांमार्फत बडनेरा, धानोरा गुरव, नांदगांव खंडेश्वर या मार्गावर दिवसभरात २२ फेऱ्या व नेर आगारामार्फत नेर, शिवणी, नांदगांव खंडेश्वर या मार्गावर दिवसभरात १३ फेऱ्या चालनात असल्यामुळे विद्यार्थी शेतकरी, मजूर व रुग्णांची गैरसोय झालेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्हयातील सिल्लोड तालुक्यात प्रधानमंत्री पीकविमा योजनेत कृषी विभागाच्या अनास्थेबाबत**

**(३८) ७९४३९ (०९-०५-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्हयातील सिल्लोड तालुक्यात प्रधानमंत्री पीकविमा योजनेत कृषी विभागाच्या अनास्थेमुळे रब्बी हंगामासाठी शेतक-यांनी विमा भरण्याकडे दुर्लक्ष केले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, तद्नुसार रब्बी हंगामामध्ये शेतक-यांनी पीकविमा काढावा यासाठी शासनाने जनजागृती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१४-०७-२०१७) :**(१) हे खरे नाही. प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत रब्बी हंगाम २०१६-१७ मध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील ३३२९ शेतकऱ्यांनी रु.४५.४१ लाख विमा हप्ता भरुन २७४२.९२ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित केलेले आहे. तसेच सिल्लोड तालुक्यातील ६३६ शेतकऱ्यांनी योजनेत सहभाग घेतला असून ६८८.७८ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित केलेले आहे.

(२) प्रश्न उदभवत नाही.

(३) प्रधानमंत्री पिक विमा योजना रब्बी हंगाम २०१६-१७ मध्ये शेतकरी सहभाग वाढविणेस्तव वृत्तपत्रामध्ये जाहिरात, तसेच योजनेविषयी बातम्या प्रसिध्द करण्यात आल्या त्याचप्रमाणे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे याकरिता क्षेत्रियस्तरावर शेतकरी मेळावे, रब्बी हंगामपूर्व बैठका इ. माध्यमातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील शेतक-यांना ठिबक सिंचन अनुदानाचा लाभ मिळाला नसल्याबाबत

**(३९) ७९५३५ (१४-०४-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतक-यांना ठिबक सिंचन योजनेसाठी शासनाकडून अनुदान देण्यात येते हे खरे आहे काय,

(२) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील कृषी विभागाकडून सन २०१४-१५, २०१५-१६ व २०१६-१७ या वर्षातील ठिबक सिंचन अनुदानाचा लाभ शेतकऱ्यांना मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती शासनाने करमाळा तालुक्यातील शेतकऱ्यांना अनुदान मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१८-०७-२०१७) :**(१) होय.

(२), (३) व (४) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील सन २०१४-१५ या वर्षात पूर्वसंमती दिलेल्या १० लाभार्थ्यांचे रु.७.७० लाख एवढ्या रक्कमेचे अनुदान प्रलंबित होते. त्यासाठी सन २०१६-१७ या वर्षात निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सन २०१५-१६ या वर्षातील पूर्वसंमती दिलेली प्रकरणे प्रलंबित नाहीत.

सन २०१६-१७ या वर्षात ज्या शेतकऱ्यांना पूर्वसंमती देण्यात आली आहे, अशा शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर अनुदानाची रक्कम जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पंतप्रधान पीकविमा योजनेअंतर्गत शेतक-यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत**

**(४०) ८००४६ (१५-०४-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जूनी राष्ट्रीय कृषी पीक विमा योजना रद्द करून व्यापक स्वरूपातील पंतप्रधान पीक विमा योजना खरिप हंगामापासून संपूर्ण राज्यभर राबविण्यात येत असून नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास जास्तीत जास्त भरपाई देण्याची तरतूद असणा-या नव्या योजनेला शेतक-यांनी मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद दिला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुर, गारपीट, भूस्खलन व काढणीपश्चात नुकसान यामुळे पिकाचे नुकसान झाल्यास भरपाई देण्याची तरतूद सुधारित पंतप्रधान पीक विमा योजनेत असून त्यानुसार खरिप हंगामात पावसाचा मोठ्या प्रमाणात पडलेल्या खंडामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेल्या शेतक-यांना दिनांक ३१ डिसेंबर, २०१६ पर्यंत भरपाई मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार नुकसानग्रस्त शेतक-यांना संबंधित विमा कंपनीकडून नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२९-०६-२०१७) :**(१) होय.

(२), (३) व (४) खरीप हंगाम २०१६ मध्ये स्थानिक नैसर्गिक आपत्ती, हंगामातील प्रतिकुल परिस्थिती, काढणी पश्चात नुकसान भरपाई इत्यादी बाबी अंतर्गत राज्यातील १४१२७ शेतकऱ्यांना रु.८.२१ कोटी नुकसान भरपाई विविध विमा कंपन्यामार्फत निश्चित करुन शेतकऱ्यांना वाटप करण्यात आलेली आहे. तसेच, पिकांच्या सरासरी उत्पन्नाच्या आकडेवारीच्या आधारे अधिसुचित विमा क्षेत्र घटकातील अधिसुचित पिकांची नुकसान भरपाई विमा कंपन्यांमार्फत निश्चित करण्यात आली आहे. राज्यातील १.०९ कोटी सहभागी शेतकऱ्यांपैकी २४.१७ लाख शेतकऱ्यांना रुपये १६९५.०१ कोटी नुकसान भरपाई पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यासाठी संबंधीत बँकांकडे विमा कंपनीमार्फत वर्ग करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हयातील शेतकऱ्यांना पंतप्रधान पिक विमा योजनेचा लाभ मिळण्याबाबत**

**(४१) ८०६८७ (१४-०४-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील शेतकऱ्यांना पंतप्रधान पिक विमा योजनेचा लाभ माहे जानेवारी २०१७ पर्यंत प्राप्त झालेला नसून पंतप्रधान पिक विमा योजनेच्या अटी तसेच शेतकऱ्यांजवळ पिक विमा उतरविण्याचा कुठलाही पुरावा राहत नसल्याने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळविण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तदनुसार सदरहू शेतकऱ्यांना पंतप्रधान पिक विमा योजनेचा लाभ मिळण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१४-०७-२०१७) :**(१), (२) व (३) हे खरे नाही.

प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप हंगाम २०१६ पासून राज्यात राबविण्यात येत आहे. यवतमाळ जिल्हयामध्ये सदर योजना रिलायन्स इन्शुरन्स कं. ली. मार्फत राबविण्यात आली. खरीप हंगाम २०१६ मध्ये सदर योजनेअंतर्गत यवतमाळ जिल्हयातील ४.०२ लाख शेतकऱ्यांनी सहभाग घेऊन ३.६६ लाख हे. क्षेत्र विमा संरक्षीत केले. त्यापैकी ६४२२४ शेतकऱ्यांना रु. ३५.०२ कोटी नुकसान भरपाई निश्चित करण्यात आली असून ती पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यासाठी संबंधीत बँकांकडे वर्ग करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ राष्ट्रीय दुध विकास योजनेतुन यवतमाळ जिल्हयाला वगळण्यात आल्याबाबत.**

**(४२) ८१३८५ (१२-०४-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा व विदर्भातील दहा जिल्हयामध्ये राष्ट्रीय दुध विकास योजना कार्यान्वित करण्यात येणार असल्याने यामध्ये यवतमाळ जिल्हयात अमुल मार्फत दुध नियोजनाचे कार्य सुरु असल्याने सदर जिल्हा हा प्रकल्पातुन वगळण्यात आल्याचे दिनांक २२ जानेवारी, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास दुध उत्पन्न वाढीच्या प्रकल्पामध्ये या आधी यवतमाळ जिल्हा समावेशीत होता तथापि, या योजनेतुन सदर जिल्हयाला वगळल्याने जिल्हयातील दुध उत्पादक व गायी म्हशी, पालक शेतकरी यांच्या दुध उत्पन्न वाढीवर परीणाम झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय दुध विकास योजनेमध्ये यवतमाळ जिल्हाला समाविष्ट करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२९-०६-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(३) व (४) राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत विदर्भ व मराठवाडा विभागात दुध उत्पादन वाढीसाठी राबवावयाच्या विशेष प्रकल्पामध्ये यवतमाळ जिल्ह्यातील अमूल दूध संघाच्या कार्यक्षेत्रातील गावे वगळून इतर गावांचा राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाकडून सर्वेक्षण करुन अशी गावे या प्रकल्पामध्ये समाविष्ट करण्यास शासन निर्णय दिनांक ९ मे, २०१७ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

---

**वसई-विरार (जि.पालघर) परिसरातील एस.टी.बसेस अचानक बंद केल्याबाबत**

**(४३) ८१५४९ (१७-०४-२०१७). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार (जि.पालघर) परिसरातील एस.टी.बसेस अचानक बंद केल्यामुळे भुईगाव, निर्मळ, कळंब, रानगाव गिरिज, अर्नाळा, नंदाखल इत्यादी समुद्रकिनाऱ्यावरील गावातून लोकल (रेल्वे) पकडण्यासाठी रेल्वेस्थानकापर्यंत पोहोचण्यासाठी रहिवाश्यांची मोठी गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय
(३) असल्यास, तदनुसार रहिवाश्यांची गैरसोय होऊ नये याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) सद्यस्थितीत राज्य परिवहन महामंडळाच्या पालघर विभागातील वसई या आगारातून ७ नियते व नालासोपारा आगारातून १४ नियते अशी एकूण २१ नियते, ६२२ फेऱ्या व ४२६६.४ कि.मी. द्वारे रानगांव, गिरीज, भुईगांव, कळंब, रोजोडी, नाळा, गास व उमराळे या गावांना शहरी वाहतूकीद्वारे राज्य परिवहन महामंडळ सेवा पुरवित असल्यामुळे या मार्गावर प्रवाशांची कोणतीही गैरसोय झालेली नाही. तसेच, अर्नाळा नंदाखाल या गावांच्या मार्गावर वसई-विरार शहर महानगर पालिकेची वाहतूक सुरु आहे. त्यामुळे प्रवाशांची कोणती गैरसोय झालेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### सुकरवाडी (ता.बोरिवली जि.मुंबई उपनगर) येथील एस.टी.डेपोची दुरवस्था झाल्याबाबत

**(४४) ८२३५१ (१७-०४-२०१७). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुकरवाडी (ता.बोरिवली, जि.मुंबई उपनगर) येथील एस.टी.डेपोची अत्यंत दुरवस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनामार्फत सदर डेपोची पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार सदर डेपोची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०६-२०१७) :**(१) नाही.

(२) व (३) सुकुरवाडी, बोरीवली येथील मुख्य बसस्थानक सुस्थितीत असून, बसस्थानकात ४ फलाट आहेत. बसस्थानकावर ठाणे प्रवाशी शेडच्या दुरुस्तीचे काम करण्यात आले असून, त्यामध्ये शेडची उंची वाढविणे, नवीन मेटाकलर पत्रे बसविणे, विटांचे बेंचेस बांधून ग्रेनाईट लावणे, व्हेट्रीफाईट टाईल्स बसविणे व रंगकाम करणे इ. बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात रास्त दरात डाळींचा पुरवठा करण्याबाबत

**(४५) ८२६४९ (१४-०४-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दुष्काळामुळे केवळ दोन वर्षात डाळींच्या उत्पादनात निम्म्याहून अधिक म्हणजे १,७५९ टन घट झाली असून ती उर्वरित सर्व राज्यांच्या एकूण घटलेल्या उत्पादनांहूनही अधिक असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे राज्यात डाळींचा तुटवडा निर्माण होणार असून त्यांचे भाव वाढण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने निर्णय घेवून राज्यातील जनतेला रास्त दरात डाळींचा पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२२-०६-२०१७)** :(१) राज्यात जून ते ऑक्टोंबर या कालावधीत सन २०१४ मध्ये सरासरी पर्जन्यमानाच्या ७० टक्के व सन २०१५ मध्ये ५९.४ टक्के पाऊस झाला होता. या कमी पर्जन्यमानामुळे सदर कालावधीत पिकांच्या उत्पादनामध्ये लक्षणीय घट झालेली होती. तथापि, सन २०१६ मध्ये ९४.९ टक्के इतके समाधानकारक पर्जन्यमान झाले असल्याने तृणधान्य, कडधान्य (डाळी) व गळीतधान्य पिकांच्या उत्पादनात वाढ अपेक्षित आहे.

राज्याच्या सन २०१५-१६ च्या आर्थिक पाहणीनुसार कडधान्य पिकांची गरज १४.१५ लाख मे.टन असून, सन २०१६-१७ मध्ये प्रत्यक्षात ३३.०८ लाख मे.टन कडधान्य पिकांचे (डाळींचे) उत्पादन अपेक्षित असल्याने राज्यात डाळींचा तुटवडा होण्याची शक्यता नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चालक तथा वाहक या पदासाठी भरतीकरिता जाचक अटीमुळे अनेक सुशिक्षित बेरोजगारांना अर्ज भरता न आल्याबाबत**

**(४६) ८२७९४ (१३-०४-२०१७). श्री.अनिल कदम (निफाड), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या माहे जानेवारी, २०१७ वा त्यादरम्यान चालक तथा वाहक या पदासाठी भरतीकरिता जाचक अटीमुळे अनेक सुशिक्षित बेरोजगारांना अर्ज भरता आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जाचक अटी शिथील करण्यासंदर्भात शासन काही फेरविचार करणार आहे काय,

(३) असल्यास, शासनाने यासंदर्भात अद्याप कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०६-२०१७)** :(१), (२) व (३) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाद्वारे पर्यवेक्षकीय व घटक संवर्ग पदांमधील एकूण १४२५३ पदे भरण्याकरीता दि.०५.०१.२०१७ रोजी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसारित करण्यात आली असून त्यामध्ये चालक तथा वाहक (कनिष्ठ) या प्रवर्गातील ७९२९ पदांसाठी जाहिरात देण्यात आली आहे. चालक तथा वाहक (कनिष्ठ) या पदासाठी चालक व वाहक बॅच (बिल्ला) असणे आवश्यक असल्याची अट समाविष्ट करण्यात आली आहे. सदर जाहिरातीस पुरेसा प्रतिसाद मिळून चालक तथा वाहक (कनिष्ठ) या पदासाठी पुरुष उमेदवारांचे २७८२७ व महिला उमेदवारांचे ४४५ असे एकूण २८२७२ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झालेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बाभुळगाव (जि.अमरावती) तालुक्यातील शासकीय पशु चिकित्सालयात औषधाचा तुटवडा असल्याबाबत**

**(४७) ८३३०७ (१३-०४-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाभुळगाव (जि.अमरावती) तालुक्यातील शासकिय पशु चिकित्सालयामध्ये औषधीसाठा उपलब्ध नाही औषधांचा तुटवडा आहे असे कारण सांगुन सबंधित विभागाचे कर्मचारी शेतकऱ्यांना खाजगी दुकानावरुन स्वखर्चाने औषधी आणायला सांगुन जनावरांचे उपचार करतात, त्यामुळे पशुपालकांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे दिनांक १२ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पशु चिकित्सालयामध्ये औषधांचा साठा उपलब्ध करण्याबाबत नागरीकांनी पशुधन विकास अधिकारी-यांना निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बाभुळगाव येथील शासकिय पशु चिकित्सालयामध्ये औषधी साठा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२९-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) बाभुळगाव तालुक्यात श्रेणी-१ चे २ श्रेणी-२ चे ६ पशुवैद्यकीय दवाखाने कार्यरत असून या सर्व संस्थांना सन २०१६-१७ या वर्षामध्ये औषधी साठा उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. तसेच सन २०१७-१८ साठी औषधी खरेदी प्रक्रीया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील काटोल व नरखेड तालुक्यातील कपाशी व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना वाढीव मदत व हमीभाव मिळण्याबाबत**

**(४८) ८३४१६ (१४-०४-२०१७). डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील काटोल तालुक्यात एकूण ५०,००० हेक्टर क्षेत्रफळापैकी कपाशी पिकाच्या लागवडीचे क्षेत्र २२,००० हेक्टर आर. व सोयाबीन पिकाचे क्षेत्र १५,००० हेक्टर आर. आहे आणि नरखेड तालुक्यात एकून ४८,००० क्षेत्रफळापैकी कपाशी पिकाच्या लागवडीचे क्षेत्र २४,००० हेक्टर आर. व सोयाबीन पिकाचे क्षेत्र १२,००० हेक्टर आर. आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सततची नापिकी, वेळी-अवेळी पडणारा पाऊस, गारपीट, वादळ यामुळे होणारे शेतमालाचे नुकसान व पिकांच्या उत्पन्नात होणारी घट, शेतमालाला कमी मिळणारा हमीभाव, पिकांच्या नुकसानाच्या मानाने शासनाकडून कमी मिळणारी नुकसान भरपाई यामुळे शेतकरी वर्ग आर्थिक अडचणीत आला असल्यामुळे आत्महत्येचे प्रमाण वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आत्महत्या रोखण्याकरीता उक्त क्षेत्रातील सदरहु शेतकऱ्यांना शासनाकडून वाढीव मदत तसेच कपाशी व सोयाबीन या खरीप पिकांना वाढीव हमीभाव मिळणार आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१२-०७-२०१७)** :(१) खरीप हंगाम सन २०१६-१७ मध्ये काटोल तालुक्यात एकूण ५०,००० हे. क्षेत्रफळापैकी सोयाबीन पिकाची १४,७९४ हे. व कापूस पिकाची २१,६५५ हे. क्षेत्रावर पेरणी करण्यात आली होती. तसेच नरखेड तालूक्यात एकूण ४८,००० हे. क्षेत्रफळापैकी सोयाबीन पिकाची १२,४८४ हे. व कापूस पिकाची २३,६९५ हे. क्षेत्रावर पेरणी करण्यात आली होती.
(२), (३) हे खरे नाही.
किमान आधारभूत किंमत जाहीर करणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारितील त्यारीतील आहे. विक्री हंगाम २०१६-१७ करीता केंद्र शासनाने कापूस लांब धागा व सोयाबीन या पिकासाठी प्रति क्विं. अनुक्रमे रु.४१६०/- व रु २७७५/- इतकी किंमत जाहीर केली आहे.
राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आवक वाढून दरामध्ये घसरण झाल्याने माहे ऑक्टोबर २०१६ ते डिसेंबर २०१६ या महिन्यामध्ये सोयाबीन विक्री केलेल्या शेतकऱ्यांना प्रति क्विंटल रु. २००/- व जास्तीत जास्त २५ क्वि. प्रती शेतकरी याप्रमाणे शासन निर्णय क्र. सपस-२०१७/प्र.क्र.५/२४-स, दि. १०/१/२०१७ च्या आदेशान्वये अनुदान देण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वणी (ता.वणी, जि.यवतमाळ) आगारामध्ये बसेसची मोठया प्रमाणात कमतरता असून त्या सुस्थितित नसल्याबाबत

**(४९) ८४३६४ (१५-०४-२०१७). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वणी तालुक्यातील (जि.यवतमाळ) दररोज हजारो प्रवाशांची वाहतुक करण्याची क्षमता असलेल्या एस.टी. डेपो मध्ये मोठया प्रमाणात बसेसची कमतरता असणे तसेच त्या सुस्थितित नसणे यावरुन महामंडळाचा दर्जा गत काही वर्षापासुन घसरला असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे प्रवाशांना व विदयार्थ्यांना बसेच्या कमतरतेमुळे व नादुरुस्तीमुळे त्रास सहन करावा लागतो आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, तदनुसार बसेसची दुरूस्ती व बसेसची संख्या वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०६-२०१७) :**(१) व (२) नाही.
(३) व (४) राज्य परिवहन महामंडळाच्या वणी आगारातून ५१ नियते चालविली जातात. त्याकरीता एकूण ५३ वाहने उपलब्ध आहेत. तसेच बसेसची देखभाल/दुरुस्ती राज्य परिवहन महामंडळाच्या देखभाल कार्यक्रमाअंतर्गत केली जाते.

वणी आगारास सन २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये नविन ११ बसेस देण्यात आल्या असून, सन २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये ०५ बसेस मोडीत काढण्यात आल्या आहेत. वणी आगारातील राज्य परिवहन वाहनाचे सरासरी आयुर्मान ५.०९ वर्षे इतके आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई सेंट्रल एसटी आगाराची काही जागा मेट्रो-३ चे प्रस्तावित स्थानकसाठी वापरावी लागणार असल्याबाबत

**(५०) ८४७३५ (१२-०४-२०१७). अॅड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई सेंट्रल एसटी आगाराची काही जागा मेट्रो-३ चे प्रस्तावित स्थानक व प्रवाशांच्या सोयीसाठी नियोजित मार्गासाठी आगाराची काही जागा मेट्रोच्या कामासाठी वापरावी लागणार असल्याने या आगारातील वाहतूक अन्यत्र हलविण्याची एसटी महामंडळाने निर्णय घेतल्याची बाब माहे सप्टेंबर-२०१६ च्यासुमारास निदर्शनास आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील प्रकरणी चौकशी करण्यात आली काय,
(३) असल्यास, चौकशीअंती मेट्रो मार्गासाठी मुंबई सेंट्रल एसटी आगारातील वाहतुकीवर कोणताच परिणाम होणार नाही याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१२-०६-२०१७) :**(१), (२) व (३) मुंबई सेंट्रल आगारातील वाहतूक अन्यत्र स्थलांतरीत करण्याबाबत कोणताही निर्णय महामंडळाने घेतलेला नाही.

राज्य परिवहन महामंडळाच्या मुंबई सेंट्रल येथील मध्यवर्ती कार्यालयाशेजारील, मध्यवर्ती वाहनकक्ष येथील जमीनीवरील १६६ चौ.मी. व जमीनीखालील ८० चौ.मी. अशी एकूण २४६ चौ.मी. क्षेत्रफळाची जमीन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे कायमस्वरुपी हस्तांतरीत करण्यास महामंडळाने मंजूरी दिली आहे. तसेच १८९ चौ.मी. क्षेत्रफळाची जमीन

तात्पुरत्या स्वरुपात अशी एकूण ४३५ चौ.मी. क्षेत्रफळाची जमीन मेट्रो-३ मधून येणाऱ्या राज्य परिवहन प्रवाशांसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे वार्षिक रु.१/- नाममात्र दराने भाडेतत्वावर हस्तांतरीत करण्यास महामंडळाने माहे मे २०१६ मध्ये मंजूरी दिली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.